**<u>प्रतिवादी क्र. १ ते ४ व ७ ते १० तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. मंदार दातार याच्यामार्फत सुरु.</u>**

५. माझी जन्म तारीख ०१/०६/१९५५ आहे. माझे शिक्षण चौथी पर्यंत झालेले आहे. माझे उत्पन्नाचे साधन शेती आहे. मला कोणतेही वादीने काय साक्ष द्यायची हे सांगितलेले नाही. मी स्वतः हून कोर्टात येउन साक्ष देत आहे. मला न्यायालयाचे साक्षी समन्स आलेले नाही. काळूराम सखाराम पाटील माझे सख्खे मामा आहेत. ते माझे मामा होते हे दाखवणारा पुरावा माझ्याकडे नाही. वादीचा दावा काय आहे व प्रतिवादीने काय म्हणणे दिलेले आहे हे मी वाचले आहे. वादी व प्रतिवादीने दाखल केलेले कागदपत्र मी समजून घेतलेले आहे. माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र वकिलांनी तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी प्रतिज्ञापत्र तयार केले व मी सही केले. मी वकिलांना माहिती देतांना माझ्याबरोबर माझी वहिनी व मामे बहीण होती.

६. दावा मिळकतीचे वर्णन मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा कोणते मिळकतीबाबत आहे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्यात नमुद केलेले सदर जमीन म्हणजे कोणती मिळकत आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्यात नमुद केलेली सदर जमीन वादीच्या ताबेकब्जात आहे असे नमुद केलेले आहे त्या जमिनीचा सर्वे नंबर मला सांगता येणार नाही. सदर जमीन म्हणजे कोणता सर्वे नंबर हे मला सांगता येणार नाही. वादीच्या वडीलांचे गावामध्ये घर आहे हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा म्हणजे घरपट्टी आहे. ती घरपट्टी मी दाखल करु शकतो. सात ते आठ एकर शेत जमीन आहे हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा मी पुढील तारखेस दाखल करण्यास तयार आहे.

७. माझ्या पुराव्यातील परिच्छेद क्र.२ बाबत कागदोपत्री पुरावा मी पुढील तारखेला दाखल करण्यास तयार आहे.

**प्रश्नः** काळुराम पाटील दारुच्या अहारी गेले होते हे दाखवणाारा कागदोपत्री पुरावा तुमच्याकडे आहे का?

**उत्तरः** मी स्वतः पाहिलेले आहे.

दारुच्या व्यसनामुळे काळुराम पाटील आजारी झाले नव्हते. त्यामुळे त्यांच्यावर उपचार करण्याची वेळ आली नाही. माझ्या पुराव्यातील परिच्छेद क्र.३ व ४ मधील घटना सन

१९६० च्या कालावधीमधील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन १९६० साली माझे वय ५ वर्ष होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७३ मध्ये मी सज्ञान झालो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या परिच्छेद क्र.३ व ४ मधील घटना घडल्या तेव्हा मी ५ वर्षांचा होतो. त्यामुळे मी त्या घटना प्रत्यक्ष बघितलेल्या नाहीत. माझ्या पुराव्याच्या परिच्छेद क्र.३ व ४ मधील घटनांबाबत कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, परिच्छेद क्र.४ मधील मजकुर बहिणीने सांगितला म्हणुन मी लिहिलेला आहे. मला त्याबाबत प्रत्यक्ष माहिती नाही. पुराव्यामध्ये नमुद केलेल्या सदर मिळकतीचे क्षेत्रफळ मला सांगता येणार नाही. ती जमीन लागवडी योग्य होती. नमुद केलेली सदर जमीन माझ्या घरापासून दोन किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी ताकई–आडोशी रस्त्यावरुन ये–जा करतो. सदर जमीनीमध्ये आता इमारती झाल्या आहेत याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्यात नमुद केलेल्या मजकुराला माझ्या शब्दांशिवाय कोणताही पुरावा नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्यातील परिच्छेद क्र.१ ते ४ मधील मजकुर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींना मदत करण्यासाठी मी साक्ष देण्यासाठी आलो आहे. माझ्या घरची माणसं आहेत म्हणून मी साक्ष देण्यासाठी आलो आहे.

**प्रतिवादी क्र.११/१ यांच्या तर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.घाटवळ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ व ७ ते १० यांच्या तर्फे घेण्यात आलेला उलटपास स्विकारला त्याबाबत पुरशिस निशाणी क्र. २१० वर देण्यात आलेली आहे.**

**प्रतिवादी क्र. १२ तर्फे विधीज्ञ श्री.एम.एन.कोळी यांच्या मार्फत उलटतपास सुरु.**

१०. दाव्यामधील नमुद मिळकती कुठल्या आहेत हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, काळुराम पाटील यांच्या सात ते आठ एकर जमीन मिळकती होत्या असे नमुद केलेले आहेत त्या मिळकती कोणत्या आहेत हे मला सांगता येणार नाही. दावा मिळकती आप्पा खोपे यांना विकल्या आहेत. माझ्या पुराव्यातील नमुद केलेल्या दावा मिळकती आजही वादीच्या ताबे कब्जात आहे. त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल करु शकतो. सन

१९७५–७६ मध्ये मी वादींना शेतीकामात मदत करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सन १९६३–६४ मध्ये वादीच्या वडीलांनी दावा मिळकती विक्री केलेली आहे त्यामुळे ती त्यांच्या ताबेकब्जात नाही. दावा मिळकत सर्वे नंबर ५/१ यावर इमारतीचे विकसनाचे काम चालु आहे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्यातील मजकुर खोटा आहे व मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH

Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.07.14 16:28:35 +0530

(एस. एस. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खालापुर.

स्थळ – खालापुर.
दिनांक – १४/०७/२०२६